शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

महाविद्यालयातील वाङ:मयमंडळाच्या धर्तीवर मराठी-स्नेही-मंडळ (मराठी फॅन क्लब) तयार करण्याबाबतचे मीनाक्षी रा. पाटील प्रभारी संचालक, महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४००००१ यांचे नस्ती क्र. रामविसं/विकि/प्र.क्र.११७/प्रकल्प.२/१५/२०२० दिनांक. ०१.०१.२०२० रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.
संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 491
दि. 17 JAN 2020

d:\2019\mangutkar\circular.docx

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ : www.rmvs.in; rmvs.marathi.gov.in इ-टपाल : rmvsmumbai@gmail.com; rmvs_mumbai@yahoo.com

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र एफ १६०१४(मुंबई)

सत्यमेव जयते

नस्ती क्र. रामविसं/विकि/प्र.क्र.११७/प्रकल्प-२/ 9५ /२०२०
दिनांक : ०१.०१.२०२०

प्रति,

मा. कुलगुरू/कुलसचिव,
सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : महाविद्यालयातील वाङ्मयमंडळाच्या धर्तीवर मराठी-स्नेही-मंडळ (मराठी फॅन क्लब) तयार करण्याबाबत

महोदय,

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा-२०२० साजरा करण्यासंदर्भात मा. सचिव, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत मा. सचिव ह्यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयातील वाङ्मयमंडळाच्या धर्तीवर मराठी-स्नेही-मंडळ (मराठी फॅन क्लब) तयार करण्यात यावे, असे सुचवण्यात आले आहे.

वाङ्मय मंडळाप्रमाणे प्रत्येक विद्यापीठाने विद्यापीठात तसेच आपापल्या विद्यापीठाशी सलग्न असलेल्या प्रत्येक महाविद्यालयात मराठी-स्नेही-मंडळ तयार करावे. त्या अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मराठी विकिपीडियावर लेखन करण्यास प्रोत्साहन द्यावे. यासंदर्भात महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या स्तुत्य कार्यक्रमाची माहिती शासनाला दिल्यास शासन त्याची दखल घेईल, असे महाविद्यालयांना कळविण्यात यावे, ही विनंती.

आपली,

07/07/2020

(मीनाक्षी रा. पाटील)
प्रभारी संचालक

Scanned by CamScanner